वर्ष- १२ | अंक- १९ | मुंबई, मंगळवार,२४ मार्च २०२६ ते ३० मार्च २०२६ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No. PLG/205/2025- 2027

PG|2

पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

हिवाळ्यात गूळासोबत हरभरा एक उत्तम सुपरफूड

3 → कर्मचार्यांची पीएफ वाढ हाच महागाईवरचा उतारा

वयोवृध्दाला १५.५० लाखांचा गंडा, डिजिटल अटकेची दाखवली भीती ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

"ऑनलाइन साइट्सवर महिलांना पिज्झासारखं विकलं जातंय..."

इंटरनेटचा काळा बाजार : पीडितांचे हृदयद्रावक अनुभव

हिंगोली। इंटरनेटचं जग जितकं सोयीस्कर आहे तितकेच ते भयानक आहे. नुकतंच, 'इंडिपेंडेंट अँटी-स्लेव्हरी कमिशनर'ने प्रदर्शित केलेल्या एका अहवालामुळे संपूर्ण जगाला धक्का बसला आहे. अहवालात असा दावा करण्यात आला आहे की आजच्या डिजिटल युगात, हजारो महिला ऑनलाइन वेबसाइटवर पिज्झासारख्या विकल्या जात आहेत. या वेबसाइट्सच्या माध्यमातून निर्भयपणे महिलांचा व्यापार केला जातो आणि त्यांचा वापर करून लाखो रुपये कमवले जातात. सर्वात भयानक म्हणजे, मुलांना या वेबसाइट्सवर प्रवेश करण्यापासून रोखण्यासाठी कोणतेही कठोर उपाय नाहीत, ज्यामुळे निष्पाप



मुले देखील धोक्यात येतात.

या प्रकरणातील एका पीडितेने आपल्या वेदना व्यक्त करताना म्हटलं की, "जर एका ग्राहकाने मला मारून टाकलं तर किमान माज्या शरीराची ओळख पटेल म्हणून मी माज्या शरीरावर टॅटू काढले." तर दुसऱ्या महिलेने म्हटले की, "पुरुष बाहेर जाऊन पिज्झा मागवल्याप्रमाणे महिला खरेदी करत आहेत आणि हे समाजासाठी लाजिरवाणे आहे." अहवालानुसार, आयुक्त कार्यालयाने अशा 12 वेबसाइट्सवरील सुमारे 63,000 जाहिरातींचं विश्लेषण केलं आणि दहापैकी सहा जाहिरातींमध्ये तस्करी आणि शोषण स्पष्टपणे दर्शवलं गेल्याचं आढळून आलं. या वेबसाइट्सवर गुन्हेगार एकाच वेळी अनेक महिलांवर नियंत्रण ठेवतात. ग्राहक त्यांची ओळख लपवून वेबसाइट बघतात आणि महिलांना वस्तूप्रमाणे निवडतात. धक्कादायक म्हणजे, फक्त एका महिन्यात 4 कोटींहून अधिक लोकांनी या 12 वेबसाइट्सना भेट दिली.

कुटुंबाच्या विरोधात जाऊन केला प्रेमविवाह, नंतर नवऱ्याच्या त्रासाला कंटाळून...



प्रेमविवाह पत्नीसाठी धोकादायक

या प्रकरणात मृत महिलेची ओळख ही रजनी (वय 26) अशी झाली. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सुमारे अडीच वर्षांपूर्वी रजनी राजकुमारसोबत पळून गेली होती, त्यांनी प्रेमविवाह केला होता. हाच प्रेमविवाह पीडित महिला रजनीसाठी धोकादायक ठरला.

मुंबई। एका विवाहित महिलेनं गळफास घेत आत्महत्या केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. या प्रकरणात मृताच्या आईने तिच्या जावयावर अनेक गंभीर आरोप केले आहेत. संबंधित प्रकरणात पोलिसांनी गुन्हा दाखल करत पुढील कारवाई केली. हे प्रकरण हिमाचल प्रदेशातील सिरमौर जिल्ह्यातील पुरुवाला पोलीस ठाण्यातील हद्दीत घडल्याचे वृत्त आहे. दरम्यान, मृत महिलेची आई शिमला देवी यांनी तिच्या मुलीच्या मृत्यूसाठी जावई राजकुमार उर्फ रोहितवर अनेक गंभीर आरोप केले. कुटुंबाचा आरोप असा की, विवाहानंतर राजकुमारच्या वर्तनात मोठा बदल झाला होता. दोन वर्षांपासून त्याने पत्नी रजनीला बेदम मारहाण करत तिचा छळ केला. परिस्थिती बघता, रजनी आणि लहान मुलाला तिच्या पालकांच्या घरी जाऊ दिले नाही, तथापि पोलिसांनी आरोपीची चौकशी देखील केली.

पोलिसांनी तपास करत आरोपीची कसून चौकशी करत आहेत. तसेच सासू, सासरे यांचा देखील तपास केला जात आहे. या एकूण तपासातून जे समोर येईल त्यातूनच कारवाई केली जाईल, अशी माहिती समोर आली आहे. सिरमौर जिल्हा पोलिस अधीक्षक निश्चय सिंग नेगी यांच्या म्हणण्यानुसार, मृताच्या आईच्या तक्रारीवरून पोलिसांनी संबंधित कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे.

मोबाईल हॅक करून एक लाख लुबाडले

अमरावती। डोंबिवलीतील प्रगती कॉलेज हादरले! शिपायाने चौथ्या मजल्यावरून उडी घेत संपवले जीवन, प्राचार्यांच्या केबिनमध्ये काय घडलं?

डोंबिवली पूर्वेकडील दत्तनगर परिसरातील प्रगती कॉलेजमध्ये गुरुवारी दुपारच्या सुमारास अत्यंत धक्कादायक आणि हृदय पिळवटून टाकणारी घटना घडली. कॉलेजमध्ये कार्यरत असलेल्या लायब्ररी शिपायाने कॉलेजच्या इमारतीच्या चौथ्या मजल्यावरून उडी घेत आत्महत्या केली. ही घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे, या घटनेमुळे कॉलेज परिसरासह डोंबिवली शहरात खळबळ उडाली आहे. प्रवीण चौधरी (42) असे मृत शिपायाचे नाव असून ते ठाकुर्ली येथील खंबाळपाडा परिसरात राहत होते. ते गेल्या काही वर्षांपासून डोंबिवली पूर्वेकडील दत्तनगर येथील प्रगती कॉलेजमध्ये लायब्ररी शिपाई म्हणून कार्यरत होते.

प्राचार्यांच्या केबिनमध्ये काय घडलं?

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी दुपारी सुमारे सव्वातीन वाजण्याच्या सुमारास प्रवीण चौधरी हे आपल्या आई-वडिलांसह कॉलेजमध्ये प्राचार्यांशी काही कारणास्तव चर्चा करण्यासाठी आले होते. प्राचार्यांच्या कार्यालयात चर्चा सुरू असताना अचानक त्यांनी कॉलेजच्या चौथ्या मजल्यावरील बाल्कनीकडे धाव घेतली आणि क्षणात खाली उडी घेतली. ही घटना इतक्या अचानक घडल्याने उपस्थितांमध्ये एकच गोंधळ उडाला.घटनेनंतर कॉलेज परिसरात खळबळ उडाली. तातडीने त्यांना रुग्णालयात नेण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र तेथे उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला होता. घटनेची माहिती मिळताच रामनगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला.

चौधरी यांचा स्वभाव तापट

रामनगर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रवीण चौधरी यांचा स्वभाव तापट असल्याची माहिती समोर आली असून त्यांच्या कामाच्या वर्तनाबाबत कॉलेज प्रशासनाकडून यापूर्वीही त्यांना अनेकदा समज देण्यात आली होती. या संदर्भात चर्चा करण्यासाठी त्यांच्या कुटुंबीयांना कॉलेजमध्ये बोलावण्यात आले होते. चर्चेदरम्यान प्रवीण यांना अचानक राग आला आणि रागाच्या भरात त्यांनी कॉलेजच्या चौथ्या मजल्यावरून उडी घेतल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

सेल्फीसाठी परदेशी महिलेच्या मागे लागले... तिने नकार देताच तरुणांचं 'ते' कृत्य!

महिलेने इंस्टाग्राम पोस्टवर काय म्हटलं?

इनेस फारिया असं पीडित महिलेचं नाव समोर आलं असून तिने आपल्या इंस्टाग्रामवर व्हिडिओ पोस्ट करताना तिच्या भारतातील वास्तव्यादरम्यान ही घटना घडल्याचं तिने म्हटलं आहे. तसेच, भारतात पहिल्यांदाच तिच्यासोबत ही घटना घडल्याचं ती म्हणाली. याबाबत इंस्टाग्रामवर पोस्ट करताना ती म्हणाली की, "गेल्या दोन महिन्यांपासून मी भारतात आहे. भारतात माझे बहुतेक अनुभव सुंदर आणि स्वागतार्ह राहिले आहेत. पण हा दिवस वेगळा होता." इंस्टाग्रामवरील तिच्या पोस्टनुसार, तरुणांचा एक ग्रुप तिच्यासह तिच्या साथीदाराचा पाठलाग करत होता आणि तिने नकार देऊनही वारंवार त्यांच्या फोटोंची मागणी करत होता.



मुंबई। मुंबईच्या महालक्ष्मी परिसरात एका परदेशी महिला पर्यटकाने काही तरुणांवर विनयभंगाचा आरोप केल्याचं वृत्त समोर आलं आहे. संबंधित महिलेने या घटनेचा एक व्हिडीओ सुद्धा शेअर केल्याचं सांगितलं जात आहे. व्हिडिओमध्ये, दोन तरुण 15 मिनिटांपेक्षा जास्त काळ महिलेचा पाठलाग करताना दिसत आहेत आणि तिने नकार देऊन सुद्धा तिला वारंवार सेल्फी घेण्यास सांगत असल्याचं व्हिडीओमध्ये दिसून येत आहे. ''ते आमच्यावर दबाव टाकत होते...'' संबंधित महिला पर्यटकाने याबाबत म्हटलं की, मी सतत नकार देऊन सुद्धा ती मुले आमचा पाठलाग करत होती आणि आमच्यासोबत फोटोंची मागणी करत होती. मला अजिबात कम्फर्टेबल वाटत नव्हतं आणि ते आमच्यावर दबाव टाकत असल्याचं त्या महिलेने सांगितलं. तिने पुढे लिहिलं की ते 15 मिनिटांपेक्षा जास्त काळ ते आमचा पाठलाग करत होते आणि मग अशी वेळ आली की, जागा बनवण्यासाठी तिला त्यांना दूर ढकलून द्यावं लागलं, असं तिने पुढे म्हटलं. संमती आणि वैयक्तिक सुरक्षिततेचे महत्त्व अधोरेखित करताना तिने लिहिलं, "फक्त एक आठवण करून देत आहे की 'नाही' हे एक पूर्ण वाक्य आहे." त्या महिलेने पुढे म्हटले की तुमची सुरक्षितता आणि कम्फर्टला नेहमीच प्राधान्य द्यायला हवं.

पतीचे अनैतिक संबंध... संतापलेल्या पत्नीने प्रेयसीच्या १८ महिन्यांच्या चिमुकलीला संपवलं!

पोलिसांची माहिती

पोलिसांनी या प्रकरणाबाबत सांगितलं की, गावकऱ्यांना एका शेतात निष्पाप मुलीचा मृतदेह आढळला आणि त्यांनी पोलिसांना याची माहिती दिली. पोस्टमॉर्टम रिपोर्ट्सच्या आधारे प्रकरणाचा तपास सुरू केला. अखेर, पोलिसांनी संशयित महिलेला ताब्यात घेऊन चौकशी सुरू केली. सुरुवातीला महिलेने पोलिसांना दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. पण, टेक्निकल तपास आणि कठोर चौकशीत तिचं सत्य उघडकीस आलं. आरोपी महिलेने पोलिसांसमोर कबूल केलं की तिने मुलीचा गळा दाबून खून केला होता. तिने सांगितलं की तिला तिच्या पतीचा मृत मुलीच्या आईशी अनैतिक संबंध असल्याचा संशय होता. या संशयामुळे तिने आधी मुलाचं अपहरण केलं आणि नंतर तिच्या आईचा बदला घेण्यासाठी त्याची हत्या केली. तिच्या कबुलीनंतर पोलिसांनी आरोपी महिलेला अटक केली.



मुंबई । मध्य प्रदेशातील सिंगरौली जिल्ह्यात अनैतिक प्रेमसंबंधाचं भयानक प्रकरण उघडकीस आलं आहे. आपल्या पतीचे दुसऱ्या महिलेशी अनैतिक संबंध असल्याच्या संशयातून एका महिलेने १८ महिन्यांच्या निष्पाप मुलीची हत्या करण्याचा कट रचला. आरोपी महिला तिच्या पतीच्या कथित प्रेयसीला इतकी वैतागली होती की तिने पतीच्या प्रेयसीच्या निष्पाप मुलीची हत्या करून तिचा मृतदेह १० दिवस घरात लपवून ठेवल्याचं वृत्त समोर आलं आहे. नेमकं प्रकरण काय सविस्तर जाणून घ्या.

१८ महिन्यांच्या मुलीला टार्गेट केलं

संबंधित घटना ही बागदरा चौकी परिसरातील निवारी गावात घडली असून या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. प्रकरणाचा तपास करणाऱ्या पोलिसांच्या माहितीनुसार, पतीला रात्री उशिरा होणाऱ्या फोन कॉल्स आणि पती बराच वेळ फोनवर बोलत असण्याने महिलेला तिच्या पतीवर अनैतिक संबंधांचा संशय आला. यामुळे संतापलेल्या आरोपी महिलेने तिच्या कथित प्रेयसीच्या १८ महिन्यांच्या मुलीला टार्गेट केलं.

मृतदेह गुंडाळून १० दिवस घरात ठेवला...

वृत्तानुसार, दीड वर्षाच्या चिमुकलीच्या हत्येप्रकरणी अटक केलेल्या महिलेने तिच्या पतीच्या कथित प्रेयसीचा बदला



घेण्यासाठी हत्येचा कट रचल्याचं सांगण्यात येत आहे. तिने आधी तिच्या पतीच्या प्रेयसीच्या मुलीचं अपहरण केलं, तिला घरी आणले आणि बाळाचा गळा दाबून खून केला. हत्येनंतर, महिलेने बाळाचा मृतदेह पांघरुणात गुंडाळून सुमारे १०१८ दिवस घरात लपवून ठेवला. मात्र, मृतदेहाला वास येऊ लागल्याने तिने तो शेतात फेकून दिला.

गरोदर झाल्याने लग्नाचा तगादा लावताच धर्मांतरासाठी दबाव



या प्रकरणातील सर्वात क्रूर बाब म्हणजे, पीडित तरुणी गर्भवती असताना आरोपी आणि त्याच्या कुटुंबीयांनी तिच्यावर अमानुष अत्याचार केले. तरुणीने धर्मांतरास नकार दिल्यानंतर आरोपीच्या नातेवाईकांनी तिच्या पोटावर लाथा-बुक्क्यांनी गंभीर प्रहार केले, ज्याचा परिणाम म्हणून तिच्या पोटातील बाळ गर्भातच दगावले आणि तिला मृत बाळ जन्माला आले. पीडितेने केवळ अभिषेकवरच नव्हे, तर त्याच्या वडिलांवर आणि इतर नातेवाईकांवरही गैरवर्तन व अश्लील चाळे केल्याचे अत्यंत गंभीर आरोप केले असून, या भीषण घटनेमुळे मानुसकीला काळिमा फासला गेला आहे.

मुंबई । उत्तर प्रदेशातील कानपूर जिल्ह्यातून एक अत्यंत धक्कादायक आणि हृदयद्रावक घटना उघडकीस आली असून, येथे एका तरुणाने आपली खरी ओळख लपवून एका २२ वर्षीय ब्राह्मण तरुणीला प्रेमाच्या जाळ्यात ओढल्याचा प्रकार समोर आला आहे. पीडित तरुणीने दिलेल्या तक्रारीनुसार, स्वतःला 'ठाकूर' समाजाचा अभिषेक सिंह असल्याचे सांगून आरोपीने तिच्याशी मैत्री केली आणि लग्नाचे आमिष दाखवून तिचे सतत शारीरिक शोषण केले. जेव्हा तरुणीने लग्नासाठी विचारणा केली, तेव्हा आरोपीने आपण हिंदू नसून ख्रिश्चन असल्याचे सांगत खरे रूप प्रकट केले आणि लग्नासाठी तिला ख्रिश्चन धर्म स्वीकारण्याची सक्ती केली, ज्यामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

पीडित तरुणीने यापूर्वी पोलिसांकडे दाद मागण्याचा प्रयत्न केला होता, मात्र सुरुवातीच्या काळात पोलिसांनी कोणतीही ठोस कारवाई न करता केवळ तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप तिने केला आहे. आरोपी अभिषेक हा पोलिसांना आणि प्रशासनाला उघडपणे आव्हान देत असे, तसेच विविध संघटनांच्या नावाचा वापर करून तरुणीला धमकावत होता. यामुळे पीडितेने वारंवार तक्रार करूनही तिला न्याय मिळण्यास उशीर झाला, ज्यामुळे आरोपीचे धाडस अधिकच वाढले होते आणि त्याने पीडितेचा छळ सुरूच ठेवला होता.

अखेर हे प्रकरण सर्वत्र चर्चिले गेल्यानंतर आणि प्रकरणाचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी कर्नलगंज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी अभिषेक याला पोलिसांनी अटक केली असून, त्याच्यावर फसवणूक, शारीरिक शोषण, मारहाण आणि धर्मांतर विरोधी कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सध्या पोलीस या प्रकरणातील इतर आरोपींचा शोध घेत असून, पीडित महिलेला न्याय मिळवून देण्यासाठी पुढील कायदेशीर प्रक्रिया वेगाने राबवली जात असल्याची माहिती पोलीस प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

हिवाळ्यात गूळासोबत हरभरा एक उत्तम सुपरफूड



हिवाळ्यात शरीराला उबदारपणा आणि अतिरिक्त ऊर्जा आवश्यक असते. गूळ आणि हरभरा यांचे मिश्रण एक उत्तम सुपरफूड आहे. गुळातील लोह, कॅल्शियम आणि खनिजे शरीराला ऊर्जा देतात, तर हरभरा प्रथिने आणि फायबरने समृद्ध आहे. दोन्ही मिळून थंडीत शरीर उबदार ठेवण्यास मदत होते. चला जाणून घेऊया हिवाळ्यात या सुपर फूडचे सेवन करण्याचे इतर कोणते फायदे आहेत.

गूळ आणि हरभरा खाण्याचे फायदे

रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी उपयुक्त-

गूळ आणि हरभऱ्यामध्ये असलेले पोषक तत्व शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास मदत करतात. विशेषत: हिवाळ्यात सर्दी आणि खोकल्यापासून तुमचे संरक्षण करते.

पचन सुधारते-

हरभऱ्यामध्ये भरपूर फायबर असते, जे पचनसंस्था मजबूत करते. गुळामुळे पचनक्रिया सुधारते आणि बद्धकोष्ठतासारख्या समस्यांपासून आराम मिळतो.

ऊर्जेचा उत्कृष्ट स्रोत-

गुळामध्ये नैसर्गिक साखर असते जी त्वरित ऊर्जा प्रदान करते. हरभरा हळूहळू ऊर्जा सोडतो, ज्यामुळे तुम्हाला दिवसभर उत्साही राहते.

वजन कमी करण्यास उपयुक्त -

हरभऱ्याच्या सेवनाने पोट दीर्घकाळ भरलेले राहण्यास मदत होते, त्यामुळे वारंवार खाण्याची सवय नियंत्रित राहते. हे वजन कमी करण्यास उपयुक्त आहे.

गूळ आणि हरभरा खाण्याची योग्य पद्धत

नाश्त्यात गूळ आणि भाजलेले हरभरे एकत्र मिसळून खाऊ शकता. सकाळी रिकाम्या पोटी याचे सेवन केल्याने शरीराला अधिक फायदा होतो. गुळात कॅलरीज जास्त असल्याने जास्त खाऊ नये याची काळजी घ्या.

खबरदारी कोणी घ्यावी?

मधुमेही रुग्णांनी गुळाचे सेवन मर्यादित प्रमाणात करावे. याशिवाय ज्यांना गॅस्ट्रिकची समस्या आहे त्यांनी डॉक्टरांचा सल्ला घेतल्यानंतरच याचे सेवन करावे.



आवळ्याच्या पाण्याची वाफ घ्या

सर्दी आणि घसादुखीपासून त्वरित आराम मिळवा

हिवाळ्यात सर्दी, घसा खवखवणे आणि त्वचेच्या समस्या सामान्य होतात. अशा परिस्थितीत आवळा पाण्याची वाफ घेणे हा एक प्रभावी आणि नैसर्गिक उपाय आहे. आवळ्यामध्ये व्हिटॅमिन सी, अँटीऑक्सिडेंट आणि अँटीबॅक्टेरियल गुणधर्म असतात, जे सर्दीशी लढण्यास मदत करतात.

आवळा पाण्याची वाफ घेतल्याने फायदे होतात

१. सर्दी आणि खोकल्यापासून आराम

आवळा वाफेमुळे बंदनाक खुलते आणि सर्दी-खोकल्यापासून सुटका मिळण्यास मदत होते.

२. घसा खवखवणे बरे करते

आवळा पाण्याची वाफ घेतल्याने घशातील सूज आणि दुखणे कमी होते.

३. सायनसच्या समस्यांपासून आराम

आवळ्याची वाफ सायनस साफ आणि शांत करण्यास मदत करते.

४. फुफ्फुस साफ करणे

ही वाफ फुफ्फुसात साचलेली घाण आणि श्लेष्मा साफ करते, ज्यामुळे श्वास घेणे सोपे होते.

५. त्वचा चमकदार बनवा

आवळ्याच्या पाण्याची वाफ त्वचेला खोलवर स्वच्छ करते आणि चमकदार बनवते.

६. प्रतिकारशक्ती वाढवा

आवळ्यामध्ये असलेले व्हिटॅमिन सी रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते, ज्यामुळे हिवाळ्यात रोगांचा धोका कमी होतो.

७. मायग्रेनपासून आराम

आवळ्याच्या पाण्याची वाफ घेतल्याने डोकेदुखी आणि मायग्रेनच्या लक्षणांपासूनही आराम मिळतो.

८. मानसिक ताण कमी करा

गरम वाफ घेतल्याने आराम मिळतो आणि तणाव कमी होतो.

आवळा पाण्याची वाफ घेण्याची योग्य पद्धत

एका भांड्यात २-३ लिटर पाणी गरम करा. २-३ चमचे आवळा पावडर पाण्यात टाका. आपण ताजे आवळे देखील वापरू शकता. आपले डोके भांड्यावर ठेवा आणि टॉवेलने झाकून ठेवा. ५-१० मिनिटे हळूहळू वाफ घ्या. हे दिवसातून १-२ वेळा करा.

सावधगिरी

- वाफ घेतल्यावर लगेच थंड हवेत जाऊ नका.
- खूप गरम वाफ घेणे टाळा.
- श्वास घेण्यास त्रास होत असल्यास ताबडतोब डॉक्टरांशी संपर्क साधा.

आवळा पाण्याची वाफ घेणे हिवाळ्यात एक सोपा आणि प्रभावी घरगुती उपाय आहे. हे केवळ सर्दी आणि घसा खवखवणे बरे करत नाही तर रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास आणि त्वचा चमकदार बनविण्यास मदत करते. आपल्या दैनंदिन दिनचर्येत त्याचा समावेश करा आणि निरोगी रहा.



मोसंबीचा ज्यूस पिण्याचे फायदे आणि तोटे

मोसंबी, एक फळ जे आपल्या आंबट चव आणि सुगंधाने सर्वांना आकर्षित करते. हे केवळ स्वादिष्टच नाही तर आरोग्यासाठीही खूप फायदेशीर आहे. मोसंबीच्या रसामध्ये व्हिटॅमिन सी, फायबर आणि अँटिऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात, ज्यामुळे शरीराला अनेक प्रकारे फायदा होतो. चला जाणून घेऊया मोसंबी ज्यूसचे फायदे आणि तोटे. मोसंबीच्या रसाचे फायदे:

१. प्रतिकारशक्ती वाढवते: मोसंबीमध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते, ज्यामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढते. हे शरीराला संसर्गापासून वाचवण्यास मदत करते.

२. पचन सुधारते: मोसंबीमध्ये फायबर असते, जे पचन सुधारण्यास मदत करते. बद्धकोष्ठतेची समस्या दूर करण्यासाठी देखील हे उपयुक्त आहे.

३. त्वचेसाठी फायदेशीर: मोसंबीमध्ये अँटिऑक्सिडेंट असतात, जे त्वचा निरोगी आणि चमकदार बनवण्यास मदत करतात. मुरुम, डाग आणि त्वचेची जळजळ कमी करण्यासाठी देखील हे उपयुक्त आहे.

४. रक्तदाब नियंत्रित करते: मोसंबीमध्ये पोटॅशियम असते, जे रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत करते. उच्च रक्तदाबाच्या रुग्णांसाठी हे फायदेशीर आहे.

५. किडनी स्टोनला प्रतिबंध करते: मोसंबीमध्ये सायट्रिक ऍसिड असते, जे किडनी स्टोन तयार होण्यास प्रतिबंध करते.

६. वजन कमी करण्यास मदत करते: मोसंबीमध्ये कॅलरी कमी आणि फायबर जास्त असते, ज्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते.

७. ॲनिमियापासून बचाव करते: मोसंबीमध्ये लोह असते, जे ॲनिमियापासून बचाव करण्यास मदत करते.

मोसंबी ज्यूसचे तोटे:

१. एसिडिटी वाढू शकते: मोसंबी आंबट आहे, त्यामुळे त्याचे जास्त सेवन केल्याने एसिडिटी वाढू शकते.

२. दातांना हानी पोहोचवू शकते: मोसंबीचा रस दातांची इनॅमल कमकुवत करू शकतो.

३. ऍलर्जी होऊ शकते: काही लोकांना मोसंबीची ऍलर्जी असू शकते.

४. गर्भधारणेदरम्यान सावधगिरी: गर्भवती महिलांनी मोसंबीचा रस कमी प्रमाणात प्यावा, कारण यामुळे गर्भपात होण्याचा धोका वाढू शकतो.

मोसंबीचा रस कसा प्यावा:

ताजे तयार केलेले मोसंबी रस पिणे चांगले. तुम्ही त्यात थोडे मध किंवा मीठ घालून रस पिऊ शकता. त्याचा रस थंड झाल्यावर पिणे चांगले.

मोसंबीचा रस अनेक आरोग्य फायद्यांनी परिपूर्ण आहे. हे रोग प्रतिकारशक्ती वाढवते, पचन सुधारते, त्वचेसाठी फायदेशीर आहे आणि इतर अनेक आरोग्य समस्या टाळते. मात्र, अतिसेवनामुळे आम्लपित्त वाढून दात खराब होतात. त्यामुळे मोसंबीचा रस कमी प्रमाणात प्यावा.



हिवाळ्यात स्वत:ला हायड्रेट ठेवण्यासाठी या टिप्स करा फॉलो

जेव्हा जेव्हा थंडी येते तेव्हा आपले कपडे किंवा जीवनशैलीच बदलते असे नाही तर आपल्या खाण्याच्या सवयी देखील बदलतात. बाहेर कडाक्याच्या थंडीत पुन्हा पुन्हा काहीतरी गरम प्यायची इच्छा होते आणि आपण खूप कमी पाणी पितो, त्यामुळे शरीरात पाणी कमी होण्याची शक्यता खूप वाढते. आपल्या सर्वांना माहीत आहे की ऋतू कोणताही असो, शरीरातील हायड्रेशन लेव्हलची काळजी घेणे तितकेच महत्त्वाचे असते.

या ऋतूत सतत पाणी पिणे हे नेहमी ध्यानात येत नसल्यामुळे तुमचे शरीर हायड्रेटेड राहावे यासाठी तुम्ही तुमच्या आहारात आणि जीवनशैलीत काही बदल करणे फार महत्वाचे आहे. त्याचबरोबर हिवाळ्याचा आनंदही लुटता येतो. तर आज या लेखात थंडीच्या दिवसात तुमच्या शरीराला हायड्रेट ठेवण्यासाठी कोणत्या पद्धतींचा अवलंब करू शकता ते सांगत आहोत-

हिवाळ्यातील कोमट पाणी प्या

थंडीच्या दिवसात शरीराला हायड्रेट ठेवायचे असेल तर या ऋतूत होणारी लालसाही समजून घेतली पाहिजे. या ऋतूमध्ये पाणी पिण्यास थंड वाटते म्हणून आपण ते टाळतो. त्यामुळे फक्त कोमट पाणी पिण्याचा प्रयत्न करा. हे केवळ तुम्हाला अधिक आरामदायक वाटत नाही तर तुमच्या शरीराची प्रणाली देखील हलके वाटते. जर तुम्हाला नुसते पाणी प्यायचे नसेल तर शरीरातील हायड्रेशनची काळजी घेण्यासाठी कॅमोमाइल, पेपरमिंट किंवा तुळशीचा चहा देखील पिऊ शकतो.

अलर्ट ऑन करा

स्वतःला हायड्रेट ठेवण्याचा हा एक मार्ग आहे तो म्हणजे आपल्या मोबाईलमध्ये पाण्यासाठी अलर्ट ऑन करुन ठेवा. वॉटर ड्रिंकिंग अलार्म सेट केल्याने वेळेवर मोबाईल तुम्हाला पाणी पिण्याची आठवण करुन देईल. किंवा जेवणापूर्वी एक ग्लास पाणी पिण्याचा नियम करा. यामुळे शरीर हायड्रेट राहण्यास मदत होते.

चव वर अवलंबून

थंडीच्या दिवसात पाणी पिण्याची इच्छा कमी होते. विशेषतः जर पाणी पूर्णपणे साधे असेल तर काही फरक पडत नाही. अशा स्थितीत तुमच्या साध्या पाण्याला चव चाखायला द्या. आपण विविध औषधी वनस्पती आणि फळांच्या मदतीने इन्फ्यूज्ड वॉटर तयार करू शकता. हे प्यायला छान लागते आणि इतर अनेक फायदे देखील देतात.

सूप प्या

हिवाळ्यात भाज्यांची बहार असते. अशात दररोज आपल्या आवडीचे सूप बनवून प्या. याने देखील वॉटर इनटेक वाढेल आणि शरीराला पौष्टिक पदार्थ मिळतील.

पोलीस बातमी पत्र

महामुंबई

३

मुंबई, मंगळवार,२४ मार्च २०२६ ते ३० मार्च २०२६

संपादकीय

कर्मचाऱ्यांची पीएफ वाढ हाच



संपादक दिपक मोरेश्वर नाईक



निवृत्तीनंतर पेन्शनच्या माध्यमातून मिळणारा पीएफचा पैसा कर्मचाऱ्यांच्या उतारवयातला मुख्य आधार ठरतो. म्हणूनच कर्मचाऱ्यांना आपल्या पीएफ खात्यातील रक्कम एटीएम, यूपीआयद्वारे सहजरित्या काढता यावी याकरिता ईपीएफओचे प्रयत्न सुरू आहेत. तर, दुसरीकडे निवृत्त कर्मचाऱ्यांना मिळणारी कमीत कमी 1 हजार रुपयांची रक्कम 9 हजार रुपयांपर्यंत वाढवून मिळावी या मागणीवरही केंद्र सरकारकडून विचार सुरू आहे. सध्याच्या काळात पेन्शनवाढ किंवा पीएफवाढ हाच कर्मचाऱ्यांसाठी वाढत्या महागाईवरचा उतारा ठरू शकेल. ईपीएफओ लवकरच 'ईपीएफओ 3.0' ही आपली नवी डिजिटल सेवा सुरू करण्याच्या तयारीत आहे. या सेवेअंतर्गत ईपीएफ खातेधारकांना एटीएम आणि यूपीआयच्या माध्यमातून पीएफमधील पैसे काढण्याची सुविधा मिळेल. या नवीन सुविधेअंतर्गत, ईपीएफओकडून खातेधारकांना त्यांच्या पीएफ खात्याशी जोडलेले एक विशेष एटीएम कार्ड देण्यात येईल. या काडार्चा वापर करून, खातेधारक पीएफमधील पैसे एटीएम मशीनमधून काढू शकतील. याचप्रकारे खातेधारक यूपीआय आयडी वापरूनदेखील ईपीएफ खात्यांमधून पैसे काढू शकतील. ही रक्कम थेट कर्मचाऱ्यांच्या लिंक्ड बँक खात्यांमध्ये हस्तांतरित केली जाईल. नवीन वैशिष्ट्यामुळे सदस्यांना त्यांचे ईपीएफ पासबुक शिल्लकदेखील पाहता येईल. ही सुविधा एप्रिलमध्ये सुरू होऊ शकते, असा अंदाज आहे. ही सुविधा सुरू होण्याआधी कोणतीही समस्या उद्भवू नये, यासाठी ईपीएफओकडून अंदाजे १०० डमी खात्यांचा वापर करून तांत्रिक चाचणी घेतली जात आहे. ही नवीन सुविधा यूएएन पोर्टल आणि उमंग ॲपशी जोडली जाईल. या नव्या सेवेचा फायदा ईपीएफच्या 8 कोटींहून अधिक खातेधारकांना मिळेल. पीएफ काढण्याच्या नियमांनुसार, घर खरेदी/बांधकाम, दुरुस्ती, होम लोनचा परतावा, मेडिकल ट्रिटमेंट, लग्न आदी कारणांखाली खातेधारकाला 75 टक्क्यांपर्यंत रक्कम काढता येते. वेगवेगळ्या कारणांखाली पीएफची रक्कम काढण्यासाठी खातेधारकांना अटी-शर्थी पूर्ण कराव्या लागतात. तसेच एखाद्या कर्मचाऱ्याची नोकरी गेली तर तो एका महिन्यानंतर त्याच्या पीएफ शिल्लक रकमेपैकी ७५ टक्क्यांपर्यंत रक्कम काढू शकेल. जेणेकरून बेरोजगारीदरम्यान त्याला आपल्या गरजा पूर्ण करता येतील.

एखादा सदस्य वर्षभरापासून जास्त काळ बेरोजगार असेल, तर त्या सदस्याला पीएफमधील संपूर्ण रक्कम काढता येईल. सध्या, ईपीएफओची ऑटो-सेटलमेंट सिस्टम तीन दिवसांत ५ लाखांपर्यंतचे दावे निकाली काढते. तर, दरवर्षी ५ कोटींहून अधिक पैसे काढण्याच्या दाव्यांवर प्रक्रिया करते. एटीएम किंवा यूपीआय आधारित सिस्टम लागू झाल्यानंतर ही प्रक्रिया आणखी जलद होऊन खातेधारकांना लक्षणीय दिलासा मिळेल. 'ईपीएफओ ३.०' हा ईपीएफओच्या डिजिटल परिवर्तनाचा एक भाग आहे. या उपक्रमात कोअर बँकिंग सिस्टम-आधारित पायाभूत सुविधांचा समावेश असेल. ज्यामुळे सर्व सेवा एकाच डिजिटल प्लॅटफॉर्मवर उपलब्ध होतील. कागदपत्रे कमी करणे, पारदर्शकता वाढवणे आणि दाव्यांचा जलद निपटारा करणे हे यामागचे ध्येय आहे. सध्या, अनेक प्रकरणांमध्ये दाव्यांचा निपटारा करण्यासाठी १५ ते २० दिवस लागतात. नवीन प्रणालीमध्ये 3 दिवसांपेक्षा कमी वेळात दावे निकाली निघतील. यामुळे तक्रारी कमी होतील आणि खातेधारकांचा विश्वास वाढेल. निष्क्रिय खात्यातील पैसे मिळतील. एपीएफओ आता निष्क्रिय ईपीएफ खात्यांमध्ये अडकलेले पैसे खातेधारकांना परत देण्यासाठीही योजना आखत आहे. मागील 36 महिन्यांपासून कर्मचारी किंवा कंपनीकडून ईपीएफ खात्यात अंशदान/ पैसे जमा न झाल्यास ते खाते निष्क्रिय मानले जाते. काही वेळा कर्मचारी नवीन नोकरीत गेल्यानंतर नवे ईपीएफ खाते बनवले जाते. मागच्या खात्यातली रक्कम ट्रान्सफर न करता तशीच पडून राहते. अशा असंख्य ईपीएफ खात्यांमध्ये छोटी छोटी रक्कम गेली कित्येक वर्षे तशीच पडून आहे. केंद्रीय श्रम मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, जवळपास 31.86 लाख निष्क्रिय ईपीएफ खात्यांमध्ये 10,903 कोटी रुपये तसेच पडून आहेत. यामध्ये 1 हजार रुपयांपर्यंत रक्कम शिल्लक असलेल्या 7 लाख खात्यांमध्ये 30.52 कोटी रुपये पडून आहेत. तर, उर्वरित रक्कम 25 लाख खात्यांमध्ये पडून आहे. सुरुवातीच्या टप्प्यात ईपीएफओने 1.33 लाख निष्क्रिय खातेधारकांच्या खात्यात पडून असलेली 5.68 कोटी रुपयांची रक्कम परत देण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. या प्रक्रियेनुसार खातेधारकाच्या आधार लिंक्ड बँक खात्यात ही रक्कम थेट जमा होईल. ना कुठला फॉर्म भरण्याची गरज, ना कार्यालयांच्या चकरा मारण्याची आवश्यकता. सर्वकाही आपोआप होईल. पेन्शनची रक्कम वाढवण्याची मागणी - कामगार संघटनांनी ईपीएस-95 अंतर्गत किमान पेन्शन 1,000 रुपयांवरून 9,000 रुपये प्रति महिना करण्याची मागणी पुन्हा एकदा उचलून धरली आहे. हा मुद्दा संसद आणि सर्वोच्च न्यायालयात पोहोचला आहे. यामुळे कर्मचारी पेन्शन योजना 1995 पुन्हा चर्चेत आली आहे.

ईपीएस-95 किंवा कर्मचारी पेन्शन योजना 1995, ही एक सरकारी पेन्शन योजना आहे. जी संघटित क्षेत्रात काम करणाऱ्या खासगी कर्मचाऱ्यांसाठी डिझाईन केलेली आहे. ईपीएफओद्वारे या पेन्शन योजनेचे व्यवस्थापन केले जाते. एखादा कर्मचारी ईपीएफमध्ये योगदान देतो तेव्हा नियोक्त्याच्या योगदानाच्या 8.33 टक्के रक्कम पेन्शन फंडात जमा होते. सरकार देखील 15000 रुपयांपर्यंतच्या पगारावर 1.16 टक्के रकमेचे योगदान देते. ईपीएस-95 अंतर्गत एखाद्या कर्मचाऱ्याने कमीत कमी 10 वर्षे काम करत ईपीएफमध्ये नियमित रक्कम जमा केली असेल, तर त्यांना 58 वर्षांच्या वयानंतर मासिक पेन्शन मिळते. मात्र, ही पेन्शन महागाईशी जोडलेली नाही. इथेच सगळे गणित विस्कटले आहे. पेन्शनची रक्कम कर्मचाऱ्याचा पगार आणि एकूण सेवेच्या वर्षांच्या आधारावर ठरवली जाते. ही गणना सध्याच्या १५ हजार रुपयांच्या वेतन मर्यादेवर आधारित आहे. जर एखाद्या कर्मचाऱ्याने जास्तीत जास्त 35 वर्षे पेन्शन योग्य सेवा पूर्ण केली असेल, तर (15000 रु35) / 70 या सूत्राचा वापर करून कमाल पेन्शन दरमहा अंदाजे 7500 रुपये इतकी होते. सोबतच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार, ज्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या प्रत्यक्ष पगारावर आधारित योगदान देण्याचा पर्याय निवडला आहे, त्यांना त्यांची पेन्शन 7500 पेक्षाही जास्त मिळू शकते. परंतु प्रत्येक कर्मचारी 35 वर्षे सेवा पूर्ण करतोच असे नाही, त्यामुळे या योजनेंतर्गत कमीत कमी 1 हजार रुपयांची रक्कम निश्चित करण्यात आली आहे.

या किमान 1 हजार रुपयांच्या पेन्शनला कर्मचारी संघटनांचा आक्षेप असून ही रक्कम वाढवून किमान 9 हजार रुपये करण्याची मागणी ते करत आहेत. सध्याच्या घडीला ईपीएफ-95 नियमांतर्गत 82,11,182 कर्मचाऱ्यांना दरमहा पेन्शन मिळते. यापैकी 47.09 लाख कर्मचारी असे आहेत ज्यांना 9 हजार रुपयांहून कमी पेन्शन मिळते. खरे तर 9 हजार रुपयांची दरमहा पेन्शन म्हणजे आजच्या महागाईच्या जमान्यात 'उंटाच्या तोंडात जिरे असे म्हणता येईल. केंद्र सरकारने १ सप्टेंबर २०१४ पासून जुनी ६,५०० रुपये पगाराची मर्यादा वाढवून १५,००० रुपये केली होती. पेन्शनची रक्कम थेट पगाराशी जोडलेली असल्याने पगाराची मर्यादा वाढली तर पेन्शनची रक्कमदेखील वाढेल, याची जाणीव कामगार संघटनांना आहे. म्हणूनच त्यांनी पेन्शनच्या पगाराची मर्यादा वाढवून 25 हजार रुपयांवर नेण्याची मागणीदेखील श्रम मंत्रालयाकडे केली आहे.

या आकडेवारीनुसार एखाद्या कर्मचाऱ्याने किमान 10 वर्षे सेवा दिली असेल, तर त्याला किमान 3,570 दरमहा पेन्शन मिळू शकेल आणि 35 वर्षे सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्याला दरमहा 12,500 पेन्शन मिळू शकेल. शिवाय या प्रकरणी जानेवारीत सर्वोच्च न्यायालयातही दाद मागण्यात आली आहे. मागील पेन्शन मर्यादा वाढीला आता 12 वर्षे उलटल्याने केंद्र सरकारने 4 महिन्यात अभ्यास करून यावर निर्णय घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. केंद्रीय श्रम व कामगार राज्यमंत्री शोभा करंदजाले यांनी कामगार संघटनांकडून पेन्शन वाढीसंदर्भात असंख्य निवेदने आल्याचे संसदेतील लेखी उत्तरात मान्य केले. परंतु, यावर निर्णय कधीपर्यंत घेतला जाईल हे त्यांनी स्पष्ट केले नाही. सध्याची किमान 1 हजार रुपयांची पेन्शनवाढ 9 हजारांवर नेणे म्हणजे थेट नऊ पट वाढ होते. हा भार ईपीएफओ कसा पेलणार. पेन्शनसाठीची किमान वेतन मर्यादा वाढणार का? यावर केंद्राकडून उत्तर अपेक्षित आहे. किमान पेन्शनवाढीवर सकारात्मक निर्णय झाल्यास लाखो पेन्शनधारकांचे महागाईचे कोडे सुटून आर्थिक चणचणीचा किमान त्रास तरी कमी होईल हीच अपेक्षा.

कामगारांच्या जीवावर उठलेले स्फोटक कारखाने



कळमेश्वर तालुक्यात राउळगाव येथील एसबीएल स्फोटक कारखान्यात झालेल्या भीषण स्फोटाने संपूर्ण परिसर हादरून गेला. या दुर्घटनेत १९ कामगारांचा मृत्यू झाला असून अनेक जखमी अद्याप मृत्यूशी झुंज देत आहेत. वारंवार घडणाऱ्या अशा स्फोटांमुळे स्फोटक उद्योगातील सुरक्षा आणि प्रशासनाच्या जबाबदारीवर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

रविवारची सकाळ उजाडली ती नागपूर जिल्ह्यात कळमेश्वर तालुक्यातील राउळगाव येथील एसबीएल या स्फोटकांच्या कारखान्यात झालेल्या स्फोटाच्या बातमीने. सकाळी ६ ते ७ च्या सुमारास या कारखान्यात स्फोटकांच्या साठ्यामध्ये स्फोट झाले. त्यात कारखान्याची इमारत आगीच्या भक्ष्यस्थानी तर पडलीच, पण कारखान्यात कार्यरत असलेल्या १९ श्रमिकांचा आतापर्यंत मृत्यू झाला आहे, तर २२ श्रमिक गंभीररीत्या जखमी असून ते अद्यापही मृत्यूशी झुंज देत आहेत. या घटनेमुळे संपूर्ण नागपूर जिल्हा हादरला, तर जिल्हा प्रशासन ॲक्शन मोडवर आले आहे.

या स्फोटाची बातमी कळताच प्रशासन सतर्क झाले असून प्रशासनाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्याचबरोबर या परिसराचे आमदार चरणसिंह ठाकूर, तसेच माजी आमदार आणि माजी गृहमंत्री अनिल देशमुख, जिल्हा परिषद सदस्य सलील देशमुख यांनीही घटनास्थळी धाव घेतली. काही वेळाने नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे देखील घटनास्थळी पोहोचले होते. चंद्रशेखर बावनकुळे हे तेव्हापासून सतत परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. या परिसरात असे स्फोटकांचे ११ पेक्षा अधिक कारखाने असून गेल्या दीड वर्षात इथे झालेल्या २३ स्फोटांमध्ये जवळजवळ ४३ कामगारांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाली आहे, तर अनेक कामगार कायमचे जायबंदी झालेले आहेत. गेल्या सप्टेंबरमध्ये येथून जवळच असलेल्या कोंढाळी परिसरातील सोलार एक्सप्लोजिव्हज या कारखान्यात मोठा स्फोट झाला होता, तर वर्षभरापूर्वी जवळच कोतवालवाडी येथे असलेल्या एका स्फोटकांच्या कारखान्यातही असाच स्फोट झाला होता आणि त्यात काही मजूर मृत्युमुखी पडले होते, तर काही जायबंदी सुद्धा झालेले आहेत. एकूणच या परिसरात ही स्फोटांची मालिका सातत्याने सुरूच आहे, परिणामी जनजीवन विस्कळीत होत आहे. मात्र प्रशासन याबाबत काय करते आहे हा देखील प्रश्न निर्माण होतो आहे. रविवारी घडलेल्या घटनेत एसबीएलचे मालक संजय चौधरी आणि आलोक चौधरी यांच्यासह २१ जणांविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाला आहे. यात १० व्यक्तींना अटक झाली असली तरी मालक मात्र फरारच आहे. कारखान्याचे प्रबंध संचालक मात्र अटकेत असून त्यांच्यासह सर्व १० आरोपींना सदोष मनुष्यवधाच्या आरोपाखाली सहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या स्फोटात मृत्युमुखी पडलेल्या कामगारांच्या कुटुंबीयांना एसबीएल कंपनीच्या वतीने प्रत्येकी ७५ लाख रुपये, राज्य शासनाच्या वतीने प्रत्येकी ५ लाख रुपये, तर केंद्र शासनाच्या वतीने प्रत्येकी २ लाख रुपये अशी एकूण ८२ लाख रुपयांची मदत जाहीर करण्यात आल्याची माहिती पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. या प्रकरणात जखमी झालेल्यांना कंपनीकडून प्रत्येकी २५ लाख रुपयांची मदत देण्यात येणार असल्याची माहिती देखील कंपनीच्या वतीने सांगण्यात आली आहे. या दुर्घटनेत जखमी झालेल्या कामगारांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच नागपूरचे खासदार आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी हॉस्पिटलमध्ये जाऊन भेट घेतली असून जखमींच्या नातेवाइकांना दिलासा देण्याचे कामही केले आहे. अनेक कुटुंबांमधील कर्ता पुरुष अपघातात दगावला, तर १४ महिला कामगार देखील या स्फोटात जळून खाक झाल्या. या महिलांच्या चिमुकल्यांचा आक्रोशही बघवत नव्हता. सर्व मृतदेह जळाल्याने ते ओळखणे देखील कठीण झाले होते. शेवटी दोन दिवसांनंतर सर्व मृतदेहांची डीएनए चाचणी करून नंतर ते कुटुंबीयांच्या हवाली करण्यात आले. बहुतेक जखमी कामगारांना नागपूरच्या ऑरेंज सिटी हॉस्पिटलमध्ये भरती करण्यात आले असून तिथेच त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. त्यामुळे तिथे देखील नातेवाइकांनी गर्दी केली आहे. वस्तूतः स्फोटकांचा कारखाना हा एक जिवंत बॉम्बच असतो. इथे पुरेपूर सुरक्षा व्यवस्था ठेवणे गरजेचे असते. तसेच इथे काम करणाऱ्या कामगारांना देखील पुरेसे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. मात्र गेल्या दीड वर्षात झालेल्या २३ स्फोटांच्या घटनांमध्ये कारखान्यात कामगारांना असे प्रशिक्षण दिले नसल्यामुळे आणि तिथे पुरेशी सुरक्षा व्यवस्था ठेवली नसल्यामुळे हे स्फोट झाले असल्याचे सांगितले जात आहे. वस्तुतः नागपुरात डायरेक्टोरेट ऑफ एक्स्प्लोजिव्जचे मुख्यालय आहे. त्यामुळे इथे पुरेशी काळजी घेतली जाणे गरजेचे होते. मात्र त्यांचे दुर्लक्ष झालेच पण जिल्हा प्रशासनाचे देखील अक्षम्य दुर्लक्ष झालेले दिसते. मिळालेल्या माहितीनुसार येत्या सोमवारी सर्व घटकांच्या स्फोटकांच्या कारखान्यांचे संचालक, वरिष्ठ अधिकारी तसेच शासकीय यंत्रणांचे प्रमुख अधिकारी यांची एक संयुक्त बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. या स्फोटाचे पडसाद राज्याच्या विधिमंडळात देखील बुधवारी उमटले. विरोधी पक्षांनी तर याबाबत सरकारला जाब विचारलाच पण सत्ताधारी आमदारांनी देखील प्रशासनाच्या दुरवस्थेबद्दल तक्रारी केल्या. आता मानवाधिकार आयोगाने देखील या प्रकरणाची दखल घेतली असून राज्य सरकारला दोन आठवड्यांत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. दरम्यान या प्रकरणात आतापर्यंत अकरा आरोपींना अटक करण्यात आली असून ते पोलीस कोठडीत आहेत, तर उर्वरित दहा आरोपी फरार घोषित करण्यात आले आहेत. त्यांच्याबाबत लुकाऊट नोटीस देखील जारी करण्यात आली असल्याचे सांगण्यात आले. मात्र घटना घडताच हे आरोपी पोलीस आणि प्रशासनाला गुंगारा देऊन इथून पळून गेले आहेत हे निश्चित. स्फोटक निर्मितीच्या कारखान्यात असे स्फोट झाले तर कारखान्याचे तर नुकसान होतेच आणि तिथे काम करणाऱ्या कामगारांचे नाहक बळी जातात. मात्र त्याचबरोबर आजूबाजूच्या परिसराला देखील त्याचे धक्के बसतात. त्यामुळे अशा कारखान्याच्या आसपासचे नागरिक कायम दहशतीतच जगत असतात. हे लक्षात घेऊन आता प्रशासनाने नागरी सुरक्षेचाही विचार करावा अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. नवीन कारखाना आला की, त्या परिसरातील बेकारांना रोजगार मिळतो आणि परिणामी त्या परिसराचे दरडोई उत्पन्न देखील वाढते. मात्र जर असे प्रकार होऊन नाहक जीव जाणार असतील तर असा विकास काय कामाचा असाही प्रश्न विचारला जात आहे. या घटनेनंतर एसबीएल कंपनीला प्रशासनाकडून टाळे ठोकण्यात आले असून त्यांचा स्फोटक निर्मितीचा परवाना देखील रद्द करण्यात आला आहे. ही घटना घडून गेल्यावर अशी कारवाई करण्यापेक्षा आधीच दुर्घटना कशी टाळता येईल यावर उपाययोजना करण्यात यावी अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

काँग्रेसचा शरणागतीचा इतिहास कसा विसरता!

अमेरिकेबरोबर अलीकडेच झालेला व्यापार करार, चीन सैन्याशी गलवान खोऱ्यात झालेला संघर्ष, ऑपरेशन सिंदूर या मुद्द्यांच्या संदर्भात काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्याकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पक्षावर सातत्याने असभ्य भाषेत टीका करण्यात येते. राहुल गांधी हे लोकसभेतील विरोधी पक्षनेते आहेत. त्यामुळे त्यांना केंद्र सरकारच्या धोरणावर आक्षेप घेण्याचा, टीका करण्याचा अधिकार आहे. मात्र हा अधिकार वापरताना राहुल गांधी यांच्याकडून हेतूपूर्वक असत्य कथन केले जाते. या असत्य कथनामागे मोदी सरकारवर टीका करण्याऐवजी भारताला आंतरराष्ट्रीय पातळीवर बदनाम करण्याचाच हेतू दिसतो आहे. राहुल गांधी यांच्या बुद्धिमत्तेचा आवाका लक्षात घेतला तर त्यांच्याकडून अभ्यासपूर्ण टीकेची अपेक्षा नाही. राहुल गांधींनी मोदी सरकारवर आणि भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वावर टीका करण्यापूर्वी आपले वडील राजीव गांधी, आजी इंदिरा गांधी आणि पणजोबा पंडित नेहरू यांच्या पंतप्रधानपदाच्या कारकीर्दीत अमेरिका, चीन आणि पाकिस्तानपुढे कितीदा लोटांगण घातले आणि त्याचा भारताच्या नागरिकांना किती फटका बसला, याचा इतिहास जाणून घ्यावा. पंडित नेहरू यांनी १९५४ मध्ये पंतप्रधान असताना तिबेटवरील भारताचा हक्क सोडून दिला आणि तिबेटवर कब्जा करण्यास चीनला अनुमती दिली. तिबेटवरील दावा सोडताना चीनच्या आक्रमक वृत्तीचा भारतावर काय परिणाम होईल, याचा विचार पंडित नेहरू यांनी केला नाही. चीनने अक्साई चीनचा मोठा भूभाग गिळंकृत केला तरी पंडित नेहरू यांनी त्याला आडकाठी केली नाही. चीनबरोबर पंचशील करार करून पंडित नेहरूंनी अक्साई चीन गिळण्याच्या कृतीला अधिकृत मान्यताच दिली. याच चीनने १९६२ मध्ये भारतावर अचानक आक्रमण केले. हे आक्रमण थोपवण्याएवढी संरक्षण सिद्धता नेहरू सरकारकडे नव्हती. चीनच्या आक्रमणाला प्रतिकार करताना हजारो सैनिकांना आपले प्राण गमवावे लागले. संयुक्त राष्ट्र संघाच्या सुरक्षा समितीचे सभासदत्व चीनला मिळावे, यासाठी पंडित नेहरूंनी चीनची वकिली केली होती. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासूनच चीनने भारतीय सीमेलगत असणारा भूभाग काबिज करण्याच्या हालचाली सुरू केल्या होत्या. जम्मू-काश्मीरचा भाग असलेल्या अक्साई चीनवर १९५० च्या दशकात चीनने पद्धतशीरपणे कब्जा केला. त्यावेळी पंडित नेहरू 'हिंदी-चिनी भाई-भाई'सारख्या भोळसट घोषणा देण्यात मग्न होते. १९६२ च्या युद्धापूर्वीच चीनने हा भाग बळकावला होता. चीनने हा भाग बळकावल्यानंतर त्याबाबतचा मुद्दा ५ डिसेंबर १९६१ रोजी संसदेत उपस्थित केला गेला. भारताचा एवढा मोठा आणि सामरिकदृष्ट्या महत्त्वाचा भूभाग बळकावला जात असताना नेहरू सरकार का गप्प होते, असा प्रश्न संसदेत उपस्थित केल्यावर पंडित नेहरू म्हणाले होते, 'ज्या जमिनीवर गवताचे पातेही उगवत नाही, त्या भागावर हक्क सांगण्यात काहीच फायदा नसून या भागासाठी युद्ध करणे चुकीचे आहे. तसेच या भागासाठी संसदेत चर्चा करणे म्हणजे वेळ वाया घालवणे आहे.' राहुल गांधींनी मोदी सरकारवर टीका करण्यापूर्वी आपल्या पणजोबांनी हजारो चौरस मीटर जमीन चीनच्या घशात कशी घातली, याचा अभ्यास करावा. १९४७-४८मध्ये पाकिस्तानने काश्मीरमध्ये टोळीवाल्यांच्या रूपात आपले सैनिक घुसवले आणि मोठा भाग काबिज केला. हा भाग सध्या पाकव्याप्त काश्मीर म्हणून ओळखला जातो. त्यावेळी पंडित नेहरूंनी या भागातील पाकिस्तानला हुसकावण्यासाठी सैन्याला आदेश देण्याऐवजी पाकिस्तानविरुद्ध संयुक्त राष्ट्र संघात दाद मागण्याला प्राधान्य दिले. संयुक्त राष्ट्र संघाने पाकव्याप्त काश्मीरमध्ये 'जैसे थे' स्थिती ठेवण्याचा आदेश दिला. त्यानंतर पंडित नेहरू, इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांनी पाकिस्तानच्या ताब्यातील हा प्रदेश परत मिळवण्यासाठी काहीच हालचाली केल्या नाहीत. १९७१ च्या युद्धात पाकिस्तानला अतिशय लाजीरवाण्या पराभवाला सामोरे जावे लागले होते. त्यावेळी भारत-पाकिस्तान यांच्यातील युद्ध थांबावे यासाठी अमेरिका प्रयत्नशील होती. त्या युद्धात पाकिस्तानचे ९३ हजार सैनिक भारताच्या ताब्यात होते. पाकिस्तान लष्कर आणि राज्यकर्ते झुल्फीकार अली भुट्टो हे भारतीय लष्करापुढे युद्ध थांबवण्यासाठी गयावया करत होते. त्यावेळी पंतप्रधान असलेल्या इंदिरा गांधी यांनी पाकिस्तानच्या अगतिक स्थितीचा फायदा घेऊन पाकव्याप्त काश्मीरचा ताबा घेण्याची सुवर्णसंधी दवडली. पाकिस्तानचे त्यावेळचे पंतप्रधान झुल्फीकार अली भुट्टो हे भारताशी वाटाघाटी करण्याकरिता सिमला येथे आले होते. ९३ हजार पाक सैनिक ताब्यात असतानाही इंदिरा गांधी यांनी पाकव्याप्त काश्मीर परत द्या, अशी मागणी झुल्फीकार अली भुट्टो यांच्याकडे केली नाही. त्या युद्धात शेकडो भारतीय सैनिक पाकिस्तानच्या ताब्यात होते. ते सैनिक परत मिळावेत, अशी मागणीही इंदिरा गांधी सरकारने केली नाही. १९७१ चे युद्ध भारतीय सैन्याने प्रचंड पराक्रम करून जिंकूनही इंदिरा गांधी यांनी पाकिस्तानबरोबर युद्ध थांबवण्याचा करार केला. हा करार सिमला करार म्हणून ओळखला जातो. आपल्या आजीने पाकिस्तानपुढे अशी शरणागती का पत्करली, यामागची कारणे शोधण्यासाठी राहुल गांधी यांनी खरे तर प्रबंध लिहावा. बोफोर्स या स्वीडिश तोफा खरेदी करताना झालेल्या व्यवहारात मध्यस्थांना मोठी रक्कम मिळाली होती. यातील मुख्य मध्यस्थ असलेला क्वात्रोची हा इटलीचा नागरिक होता. या क्वात्रोचीला पकडण्याची संधी मनमोहन सिंग सरकारच्या काळात कोणाच्या दबावामुळे गमावली हे राहुल गांधी आपल्या मातोश्रींना म्हणजेच सोनिया गांधी यांना विचारण्यास हरकत नाही. १९८४ मध्ये भोपाळ वायू दुर्घटनेत हजारो लोकांना आपला जीव गमवावा लागला. ही वायुगळती ज्या कंपनीतून झाली त्या कंपनीचा संचालक असलेल्या वॉरेन अँडरसन याला सुखरूपपणे अमेरिकेत पाठवताना त्यावेळचे पंतप्रधान राजीव गांधी यांनी अमेरिकेपुढे का लोटांगण घातले, याचा इतिहासही युवराज राहुल गांधी समजावून घ्यावा. काँग्रेस आणि गांधी-नेहरू घराण्याचा इतिहास अमेरिका, चीन आणि पाकिस्तानपुढे लोटांगण घालण्याचाच आहे. काँग्रेसच्या या लोटांगणाची भारताला फार मोठी किंमत मोजावी लागली आहे. २०२० मध्ये आणि २०१८ मध्ये चीनच्या घुसखोरीला वेळीच रोखण्याचे काम मोदी सरकारने केले. पाकिस्तानच्या दहशतवाद्यांना मदत करण्याच्या कृत्याबद्दल मोदी सरकारने पाकिस्तानला सर्जिकल स्ट्राइक, एअर स्ट्राइक करून खणखणीत उत्तर दिले होते. युवराजांना हा स्वाभिमानाचा इतिहास कळत नाही. हा इतिहास आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर अभिमानाने सांगण्याऐवजी राहुल गांधी आपल्या देशाची बदनामी कशी होईल, यासाठी प्रयत्न करताना दिसतात.

पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार,२४ मार्च २०२६ ते ३० मार्च २०२६

एसटीत मद्यपानास 'शून्य सहनशीलता'... चालक-वाहकांची अल्कोटेस्ट तपासणी सक्तीची

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात (एसटी) सेवेत असताना मद्यपानास आळा घालण्यासाठी आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यासाठी कठोर उपाययोजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यानुसार आगारात कामावर हजर होणाऱ्या सर्व चालकांची अल्कोटेस्ट मशीनद्वारे दररोज मद्यपान तपासणी करणे बंधनकारक करण्यात आले असून, योग्य नोंदी घेऊनच चालकांना कर्तव्यावर पाठविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

२५ जानेवारी २०२६ रोजी सरनाईक यांनी परळ बसस्थानकाला भेट दिली असता तेथे काही धक्कादायक प्रकार आढळून आला. या प्रकाराची गंभीर दखल घेत मंत्री सरनाईक यांनी तातडीने चौकशी समिती नेमून या प्रकरणास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. तसेच असे प्रकार पुन्हा घडू नयेत यासाठी कडक उपाययोजना करण्यासही सांगितले होते. त्याअनुषंगाने एसटी प्रशासनाने तीन अधिकाऱ्यांची समिती नेमून या प्रकरणाची सखोल चौकशी केली. चौकशीमध्ये दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली असून, असे प्रकार पुन्हा घडू नयेत यासाठी आवश्यक उपाययोजनाही सुचविण्यात आल्या आहेत.

हा चौकशी अहवाल एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांना सादर करण्यात आला असून त्यांच्या निदेर्शानुसार दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई सुरू करण्यात आली आहे. तसेच समितीने सुचविलेल्या उपाययोजना तातडीने सर्व आगारांमध्ये लागू करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. नव्या उपाययोजनांनुसार आगारात कामावर हजर होणाऱ्या चालकांची वाहन परीक्षकांच्या माध्यमातून नियमित तपासणी केली जाणार आहे. वाहकांचीही ड्युटी देण्यापूर्वी अल्कोटेस्ट मशीनद्वारे तपासणी करून त्याची नोंद ठेवणे आवश्यक राहणार आहे. तपासणी झाली आहे की नाही, यावर सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक, सहाय्यक वाहतूक अधीक्षक, वाहतूक निरीक्षक, सहाय्यक वाहतूक निरीक्षक आणि वाहतूक नियंत्रक यांनी देखरेख ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

जनजागृतीसाठी प्रशिक्षण सत्र

एसटी कर्मचाऱ्यांमध्ये जनजागृती करण्यासाठी प्रशिक्षण सत्रांचे आयोजन करण्यात येणार असून सामाजिक संस्थांच्या सहकार्याने मद्यपानाचे दुष्परिणाम याबाबत प्रबोधन केले जाणार आहे. आगारांमध्ये ह्यमद्यपान जनजागृती सप्ताहह्न आयोजित करून चालक-वाहक व इतर कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. मुख्य बसस्थानक, चालक-वाहक विश्रांतीगृहे, ज्या आगारांमध्ये चालक-वाहक जास्त प्रमाणात थांबतात अशा ठिकाणी मद्यपानास प्रतिबंध करण्यासाठी लक्ष ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, लाइट-पंखे आदी सुविधांची देखभाल करण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर आहे.



वयोवृध्दाला १५.५० लाखांचा गंडा, डिजिटल अटकेची दाखवली भीती

ठाणे। दिल्ली क्राईम ब्रांच आणि नाशिक पोलिसांचे अधिकारी असल्याचे भासवून डिजिटल अटक केल्याचा बनाव करत ठाण्यातील कोलशेत येथील एका ६६ वर्षीय वयोवृद्धाला तब्बल १५ लाख ५० हजार रुपयांचा गंडा घातल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी कापूरबावडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

तक्रारदार हे घरी असताना ७ जानेवारी रोजी त्यांच्या मोबाईलवर अनोळखी व्यक्तीचा फोन आला. त्याने स्वतःचे नाव अजित कुमार सिंग सांगत आपण दिल्ली क्राईम ब्रांचमधून बोलत असल्याचे सांगितले. तुमच्या मोबाईल नंबरवरून एका नग्न व्हिडिओ प्रकरणात संपर्क आढळल्याचे सांगून त्यांना घाबरवण्यात आले. त्यानंतर वेगवेगळ्या क्रमांकावरून फोन करत स्वतःला डेटा प्रोटेक्शन ब्रँच कोलाबा आणि नाशिक पोलिसांचे अधिकारी असल्याचे सांगण्यात आले. तक्रार क्रमांक देत त्यांच्या आधारकार्डचा वापर करून युनियन बँकेत खाते उघडून दहशतवादी व्यवहारासाठी दोन कोटी रुपयांचे मनी लॉन्डरिंग झाल्याचा आरोप करण्यात आला. तपासासाठी सहकार्य न केल्यास देशद्रोहाचा गुन्हा दाखल होईल, अशी भीती दाखवून भामट्यांनी तक्रारदाराकडून वैयक्तिक माहिती, बँक खात्यांचे तपशील आणि संपत्तीची माहिती घेतली. तसेच



व्हॉट्सॲप व्हिडिओ कॉलवर त्यांच्यावर लक्ष ठेवत असल्याचे सांगून त्यांना घराबाहेर न जाण्याच्याही सूचना दिली. यानंतर आरबीआयच्या नियमांनुसार पडताळणीसाठी शेअर मार्केटमधील गुंतवणूक काढून दिलेल्या खात्यात जमा करण्यास सांगण्यात आले. याचदरम्यान भामट्यांनी बनावट आरबीआय पत्रही पाठवले. त्यामुळे तक्रारदाराने शेअर मार्केटमधील गुंतवणूक मोडून भामट्यांनी दिलेल्या खात्यात १५ लाख ५० हजार रुपये ट्रान्सफर केले. काही दिवसांनी त्या भामट्यांनी आणखी पैसे मागितल्याने संशय आल्यावर तक्रारदार यांनी काम करत असलेल्या वरिष्ठांना हा प्रकार सांगितला. त्यांनी ही सायबर फसवणूक असल्याचे सांगितल्यावर तक्रारदार यांनी १९३० हेल्पलाईनवर संपर्क साधून एनसीसीआरपी पोर्टलवर तक्रार नोंदवली आणि कापूरबावडी पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दिली. त्यानंतर याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक मंजुषा भोंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

एसटीच्या 'शिवनेरी' धावणार राज्यभरात... २०० अत्याधुनिक व्होल्वो बसेसची खरेदी

पुणे। पुणे ते मुंबईदरम्यान धावत असलेली एसटीची अत्याधुनिक, आरामदायी आणि सुरक्षित 'शिवनेरी' बस आता राज्यभर धावणार आहे. राज्यभर विस्तारासाठी २०० नवीन अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त व्होल्वो बसेस खरेदी करण्याची निविदा प्रक्रिया सुरू आहे. या बसेस एसटीच्या ताफ्यात दाखल होताच, मुंबईझपुणेप्रमाणेच इतर महत्त्वाच्या शहरांदरम्यानही शिवनेरी सेवा सुरू होणार आहे.

एसटी महामंडळाने २००२ मध्ये शिवनेरी बस सेवा सुरू केली. या सेवेने उच्च मध्यमवर्गीय प्रवाशांचा विश्वास जिंकला. इतर बससेवेपेक्षा तिकीटदर थोडे अधिक असतानाही सातत्याने मिळणाऱ्या उत्तम प्रतिसादामुळे ही सेवा सुरुवातीपासूनच नफ्यात आहे. त्यामुळे या बसेसचा राज्यभर विस्तार करण्याचा निर्णय एसटी महामंडळाने घेतला आहे. नाशिक-पुणे, नाशिक-छत्रपती संभाजीनगर, नाशिक-जळगाव-धुळे, पुणे-कोल्हापूर, पुणे-सांगली, पुणे-सोलापूर, नागपूर-चंद्रपूर, नागपूर-



अमरावती-अकोला अशा प्रमुख शहरांचा समावेश आहे. त्यामुळे राज्याच्या विविध भागांतील प्रवाशांना आलिशान, सुरक्षित आणि विश्वासार्ह प्रवासाचा पर्याय उपलब्ध होणार आहे. नवीन २०० बसेसमध्ये ३० शयनयान बसेसचा समावेश असेल.

सध्या ज्या मार्गावर विनावातानुकूलित शयनयान बससेवा आहे, त्या ठिकाणी 'स्लिपर शिवनेरी' सुरू करून प्रवासी सेवेला अधिक उन्नत रूप दिले जाणार आहे. आरामदायी बेड-कोच सुविधा, सुरक्षितता आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे दीर्घ पल्ल्याच्या प्रवासात प्रवाशांना नव्या अनुभवाची हमी मिळणार आहे.महिला प्रवाशांना तसेच ६५ ते ७५ वयोगटातील ज्येष्ठ नागरिकांना तिकीटदरात ५० टक्के सवलत, तर ७५ वर्षांवरील ज्येष्ठांना शिवनेरी प्रवास पूर्णपणे विनामूल्य आहे. त्यामुळे नव्या मार्गांवरही मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळेल, असा विश्वास महामंडळाला आहे. त्याचप्रमाणे सध्या दादर-स्वारगेट, दादर-शिवाजीनगर, बोरिवली-स्वारगेट, बोरीवली-शिवाजीनगर, ठाणे-स्वारगेट आणि ठाणे-शिवाजीनगर या मार्गांवर पर्यावरणपूरक ई-शिवनेरी बस सेवा सुरू असून प्रवाशांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

नुरी बाबा दर्ग्यातील 10 वृक्षांवर बेकायदा कुऱ्हाड... महापालिकेने बजावली नोटीस

ठाणे। ठाण्यातील चंदनवाडी परिसरातील हजरत नुरी बाबा दरगाह ट्रस्टच्या आवारातील प्राचीन 10 भलेमोठ्या वृक्षांवर शनिवारी (28 फेब्रुवारी) कुऱ्हाड चालवण्यात आली. ही वृक्षतोड बेकायदा असल्याचे निदर्शनास येताच स्थानिकांनी वृक्ष कत्तलीला विरोध दर्शवला. त्यानंतर याप्रकरणी स्थानिक शिवसेना नगरसेवक राजेश मोरे तसेच घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या घटनेनंतर ठाणे महापालिकेसह पोलीस प्रशासनाने या वृक्षतोडीची चौकशी करून तातडीने कारवाई करण्याची आग्रही मागणी केली आहे.

ठाणे पश्चिमेकडील मखमली तलावाच्या शेजारी असलेला नुरी बाबा दरगाह हा मुस्लीम धर्मीयांसोबतच हिंदू आणि इतर धर्मियांचे देखील श्रद्धास्थान आहे. नुरी बाबा यांच्या नावाने प्रसिद्ध असलेल्या या दर्ग्यामध्ये नुरी बाबा यांची समाधी आहे.

या दर्ग्या शेजारील मोकळ्या जागेतील चार अशोका वृक्ष, दोन सुपारीची झाडे, एक कोकम, दोन नारळाची झाडे, दोन आंबा वृक्ष



असे एकूण 10 वृक्ष शनिवारी (28 फेब्रुवारी) बेकायदा बुंध्यापासून तोडण्यात आले. स्थानिकांच्या ही बाब लक्षात आल्यानंतर त्यांनी ही बाब स्थानिक लोकप्रतिनिधींना कळवली.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन शिवसेना नगरसेवक राजेश मोरे, भाजपचे प्रदेश शेडगे यांसह शिवसेना-भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी बुधवारी प्रसारमाध्यमांसह प्रत्यक्ष पाहणी केली. हे कृत्य नुरी बाबा दरगाह ट्रस्टचे पदाधिकारी आणि नुरी कुटुंबीयापैकी कुणीतरी केल्याचा आरोप करून महापालिका प्रशासन तसेच पोलिसांनी संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

ट्रस्टला महापालिकेची नोटीस

नुरी बाबा दरगाहमधील 10 वृक्ष परवानगीशिवाय बुंध्यापासुन तोडण्यात आले आहेत. यानंतर ठाणे महापालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागाचे उद्यान निरीक्षक कृष्णनाथ धावडे यांनी तातडीने नुरीबाबा दर्ग्याच्या व्यवस्थापकांवर नोटीस बजावून खुलासा मागवला आहे. या कृत्याला, महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, 1975 चे कलम 21' (1) व (2) तरतूदीचे उल्लंघन झालेले असून अधिनियमानुसार नुरी बाबा दरगाह ट्रस्टचे व्यवस्थापक व्यक्तीशः जबाबदार असल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे ते दंड अथवा तुरुंगवासाच्या कारवाईस पात्र ठरत असल्याचे उद्यान निरीक्षक धावडे यांनी नोटीसमध्ये नमूद केले आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती (ई) नालासोपारा (पश्चिम)

मुख्य कार्यालय विरार

दुरध्वनी क्र. १२२५० - २४०२१७९ / २४०२५६३

जावक क्र. :- व.वि.श.म./क.वि./२६१/२५-२६

दिनांक :- १८/०३/२०२६

जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहीर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

अ. क्र.	विभाग	मालमत्ता क्रमांक.	रिसीट नं	ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणा-या किंवा करदात्याचे नाव	खरिददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव
१	निळेमोरे-७	NL३०/४१०/४९	२५१३३	ओम साई डेव्ह.	रितेश रविंद्र गावले / सिध्देश रविन्द्र गावले
२	निळेमोरे-७	NL३०/२७८/६	२५१४७	मारुती मुरदेश्वर पालेकर	रामचंन्द्र डी गांगरकर / स्वप्नील रामचंन्द्र गागरकर
३	निळेमोरे-७	NL३०/३७८/१३०	२५१३०	सहारा श्रीजी बिल्डर्स डेव्ह.	विजयकुमार यादव / ललिता विजय यादव
४	निळेमोरे-७	NL३०/१९९/११९	२४४८५	लालचंद के पाल	सिमा अमरनाथ सिंह / अमरनाथ सिंह
५	निळेमोरे-६	NL२९/१०७/२	२५१२३	मधुकर जगन्नाथ सावे	महेश एम मिरोखे / छाया एम मिरोखे
६	निळेमोरे-६	NL२९/१२१/७	२५१२२	महाबल एच काचन	केशव सुभाष परमार व सोना सुभाष परमार
७	निळेमोरे-६	NL२९/२०२/१५४	२३९७७	महाबल एच काचन	रत्नेश कमलाप्रसाद सिंह / मंजु कमलाप्रसाद सिंह
८	निळेमोरे-६	NL२९/१६१/५	२४६८३	रेश्मा बेगम शकील अहमद सिद्दीकी	जलासिओ घोसाल डिमोला
९	निळेमोरे-६	NL२९/१५३/१२	२४६८४	वसीहा पठाण व वकार मोहम्मद	शबाना रईस अहमद
१०	निळेमोरे-६	NL२९/१०१/१५	२४९३५	गोविंद राघु भगत	नरेंद्र शिवराम आबेकर / श्रीती नरेंन्द्र आबेंकर
११	निळेमोरे-६	NL२९/९/१४	२४५८५	विकास मधुकर लाडे	भ्रमरा सुभाष वैरागर
१२	निळेमोरे-६	NL२९/२२८/४५	२५१४५	इक्बाल नुसरत अली सय्यद / शगप्ता	सुंप्रिया इब्राहिम चौधरी
१३	निळेमोरे-६	NL२९/२१०/१५	२५१४१	संस्कृती बिल्डर्स एण्ड डेव्ह.	इंदूप्रकाश ओमप्रकाश पांडे / आरती इंदूप्रकाश पांडे
१४	निळेमोरे-६	NL२९/२३६/१२६	२४६५८	मंगलमुर्ती इस्टेट डेव्ह.	रविराज रमेश चव्हाण / रुत्वी रविराज चव्हाण
१५	निळेमोरे-६	NL२९/१९६/९४	२४९४७	एस.ली. गुप्ता जी-जी गुप्ता	प्रदिप कुमार शर्मा / प्रियांका शर्मा / संदिपकुमार
१६	निळेमोरे-६	NL२९/१७५/२१७	२५१२८	साई शक्ती इंटरप्राईज	मनोजकुमार घनश्याम शुक्ला / बीनादेवी शुक्ला
१७	निळेमोरे-६	NL२९/२०७/१०३	२५१३४	साई संकल्प डेव्ह.	अनिल कुमार लक्षीकांत त्रिपाठी
१८	निळेमोरे-६	NL२९/१७७/१६९	२५१२७	दिनेश कुमार दिनकर सोनी कमार	भीमा यादव
१९	निळेमोरे-६	२९/१९५/७३	२५१३५	ज्योती शुक्ला	शिव प्रसाद रामचंद्र गोड / सत्यप्रकाश रामचंद्र गोड
२०	निळेमोरे-६	NL२९/२०२/९३	२५१३१	श्यामल नास्कर	राजेश राजराम ताम्हणकर

सही

(विजय शिंदे)

सहायक आयुक्त

प्रभाग समिती (ई) नालासोपारा

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com